# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय

रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे

फोननं. ०२२-२९४५१००१

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेसनोट क्रमांक :- १८०-२०२२ दिनांक :- १४/०६/२०२२

## घरफोडी करणा-या आरोपीतास अटक करुन चोरीस गेलेला ९ लाख ५० हजार रुपयांचा १०० टक्के मुद्देमाल तसेच गुन्हयात वापरलेली पल्सर मोटार सायकल हस्तगत-आचोळे पोलीस स्टेशनची कामगिरी.

आचोळे पोलीस ठाणे हद्दीत दिनांक ०५/०६/२०२२ रोजी १६.०० वा ते १८.०० वा चे दरम्यान फिर्यादी यांच्या रश्मी रेसीडेंन्सी, लिंकरोड सारस्वत बँकेजवळ नालासोपारा पुर्व येथील फ्लॅटच्या दरवाजाचे लॉक कुणीतरी अज्ञात चोरटयाने तोडुन घरातील सोन्याचे दागीने व रोख रक्कम असे एकुण ९ लाख ५० हजार रुपयांचा मुद्देमाल चोरी करुन नेला होता. त्याबाबत फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन आचोळे पोलीस ठाणे येथे गुरनं. I २७५/२०२२ भादंवि सं क ४५४, ३८० प्रमाणे दाखल करण्यात आला होता

सदर गुन्हयाचे तपासकामी आचोळे पोलीस स्टेशनच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाने घटनास्थळाची पाहणी करुन तांत्रीक पुरावे हस्तगत केले तसेच सदर गुन्हयाचे तपासकामी वरिष्ठांचे मार्गदर्शनाखाली २ तपास पथके तयार करण्यात आली. गोपनीय बातमीदाराचे मार्फतीने मिळालेल्या माहितीचे आधारे एक पथक गुजराज राज्यामध्ये व एक तपास पथक उत्तरप्रदेशमध्ये रवाना करण्यात आले होते. त्याचप्रमाणे सदर गुन्हयाचे समांतर तपासकामी गुन्हे शाखा युनिट-३ चे पथक देखील रवाना झालेले असल्याने त्यांचेसह संशईत आरोपी नामे दिलशाद फैयाज शेख, वय ३८ वर्षे, रा. रुम नं ५०१, आस्था बिल्डींग, आचोळे, नालासोपारा पुर्व यास दिनांक १३/०६/२०२२ रोजी ताब्यात घेवून अटक करण्यात आली होती. अटक आरोपी दिलशाद शेख याचेकडुन ९ लाख ५० हजार रुपये किंमतीचा गुन्हयात चोरीस गेलेला १०० टक्के मुद्देमाल व गुन्हा करण्यासाठी वापरलेली २५,०००/- रु किं ची मोटार सायकल असा एकुण ९ लाख ७५ हजार रुपये किमंतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

सदरची कामगिरी श्री संजयकुमार पाटील, पोलीस उप-आयुक्त परीमंडळ २, वसई, श्री पंकज शिरसाठ, सहाय्यक पोलीस आयुक्त, तुळींज विभाग, यांचे मार्गदर्शनाखाली आचोळे पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री चंद्रकांत सरोदे, श्री सुधीर गवळी, पोलीस निरीक्षक (गुन्हे), सपोनि. श्री सुधीर थोरात, पोउपनि. श्री बुधवंत लोढे, (अे.टि.सी), युनिट-३ (गुन्हे शाखा), पोहवा. दाईंगडे, नितीन जाधव, शेखर पवार, पोना प्रशांत सावदेकर, संदिप बडगुजर, पोशि अभिजीत नेवारे, बालाजी शिंदे, बालाजी संगमे, ज्ञानेश जोहरे, बंडगर यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.



---000---